




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784






वर्ष ३ रे अंक : १६५ वा बुधवार दि. १३ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# ऐतिहासिक! अमित शहांच्या उमेदवाराचा प्रतिष्ठेच्या निवडणुकीत पराभव भाजपच्याच खासदारानं धूळ चारली

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

राजधानी दिल्लीच्या प्रतिष्ठित कॉन्स्टिट्यूशनल क्लब ऑफ इंडियाच्या सचिव पदाची निवडणूक ऐतिहासिक ठरली आहे. यामध्ये भाजपचे खासदार राजीव प्रताप रुडी यांनी बाजी मारली. भाजप विरुद्ध भाजप अशा झालेल्या निवडणुकीत रुडी यांनी त्यांच्याच पक्षाचे माजी खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री डॉ. संजीव बालियान यांचा १०० पेक्षा अधिक मतांनी पराभव केला. १२ ऑगस्टला झालेल्या निवडणुकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा , काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांच्यासह अनेक दिग्गजांनी मतदान केलं होतं. रुडी यांनी १०० हून अधिक मतांनी विजय साकारला. त्यांच्या पॅनलच्या सदस्यांनीदेखील विजयाची नोंदवला. या निवडणुकीत आजी, माजी खासदारांनी मतदान केलं होतं. बालियान हे अमित शहांचे उमेदवार मानले जात होते. भाजपच्या बहुतांश खासदारांनी बालियान यांनाच मतदान केलं होतं. पण काँग्रेससह अन्य पक्षांनी रुडी यांनी भरभरुन पाठिंबा दिला. प्रशिक्षित पायलट असलेले, सर्वाधिक तास विमान चालवण्याचा विक्रम नावावर असलेले रुडी यांनी ऐतिहासिक निवडणूक जिंकण्यासाठी डोअर टू डोअर प्रचार केला. हा आपल्या पॅनलचा विजय असल्याचं रुडी यांनी सांगितलं. मी १०० मतांनी जिंकलो आहे. त्याला १००० मतदारांनी गुणल्यास ही संख्या १ लाखाच्या घरात जाते. माझ्या पॅनलमध्ये भाजप, काँग्रेस, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि अपक्ष खासदार होते. हा माझ्या अनेक दशकांच्या मेहनतीचा परिणाम आहे, अशा भावना रुडी यांनी बोलून दाखवल्या. बालियान हे भाजपचे अधिकृत उमेदवार होते. त्यांच्या मागे अमित शहांनी ताकद उभी केली होती. त्यामुळे बालियान यांचा पराभव अमित शहांचाच पराभव असल्याचं बोललं जात आहे. तर काहींच्या मते रुडी यांचा विजय निश्चित होता. बहुतांश खासदार त्यांच्या बाजूनं होतं. त्यांची लोकप्रियता असल्यानं ते निवडून येणारच होते. विरोधकांनी रुडी यांना साथ देत एकाच दगडात दोन पक्षी मारले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्वत: रुडी यांच्यासाठी पुढाकार घेतल्याची चर्चा दिल्लीत आहे. काही दिवसांपूर्वीच संसद भवन परिसरातील व्हिडीओ आता व्हायरल झाला आहे. त्यातून अनेक गोष्टींचे संकेत मिळतात. त्यावेळी माध्यमांशी संवाद साधण्याआधी रुडी यांना राहुल गांधी



भेटले. दोघांनी हसत हसत हस्तांदोलन केलं होतं. भाजप खासदारानं भाजपच्या अधिकृत उमेदवाराचा केलेला पराभव याकडे भाजप अंतर्गत कलह या दृष्टीनंदेखील पाहिलं जात आहे. रुडी यांना काँग्रेस आणि विरोधी पक्षातील खासदारांचा पाठिंबा मिळाला. बालियान भाजपचे अधिकृत उमेदवार होते. त्यामुळे विरोधकांनी बालियान यांच्या विरोधात लढणाऱ्या रुडी यांच्या पारड्यात मतांचं दान टाकलं. १२ ऑगस्टला मतदान होण्याआधी अनेक दिवस डिनर डिप्लोमसीदेखील सुरु होती. भाजपच्याच दोन नेत्यांचा आमनासामना झाल्यानं भाजपचे खासदार द्विधा मनस्थितीत होते. पहिल्यांदाच भाजप विरुद्ध भाजप लढत होत असल्यानं आमच्यासारखे नवे खासदार संभ्रमात असल्याचं भाजप खासदार कंगना रणौत निवडणुकीआधी म्हणाल्या होत्या.

# स्वतंत्र अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा मोहिमेला सुरुवात....

## नगरपरिषदेतील माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थ्यांची शहरात निघाली तिरंगा रॅली....

**जनसंचलन/बुलढाणा**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून सन २०२२ पासून हर घर तिरंगा ही मोहीम सुरू करण्यात आली आहे लोकांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता वाढवणे ही सदर उपक्रम राबवण्यामागील मूळ कल्पना आहे सदर उपक्रम भारताच्या राष्ट्रध्वजासोबत वैयक्तिक बंध निर्माण करण्यावर आधारित आहे मोहीम लोक चळवळ बनली असून या मोहिमेअंतर्गत महाराष्ट्र राज्य आणि लक्षवेधी कामगिरी केलेली आहे सन २०२५ मध्ये सुद्धा सदर मोहीम मोठ्या उत्साहात राबवण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे अनुषंगाने सन २०२५ मध्ये हर घर तिरंगा मोहीम केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे दिनांक २ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीमध्ये तीन टप्प्यांमध्ये राबवण्याचे नियोजन राज्य शासनामार्फत करण्यात आले आहे राज्यातील सर्व नागरिक स्थानिक स्वराज्य संस्थांनी मोहिमेच्या अंमलबजावणी करिता केंद्र व राज्य शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून सर्व उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी तात्काळ नियोजन करण्यात यावे सोबत केंद्र शासनाकडून निर्गमित करण्यात आले आहे. आज दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी माननीय मुख्य अधिकारी तथा प्रशासक माननीय गणेश पांडे साहेब नगरपरिषद यांच्या मार्गदर्शनाखाली तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते बुलढाणा नगर परिषदेतील माध्यमांच्या शाळेतील १२०० मुली व मुले तसेच नगरपरिषदचे सर्व शिक्षक मुख्याध्यापक शिक्षक कर्मचारी सहभागी झाले होते तिरंगा





रॅली उपमुख्य अधिकारी श्री सावळे साहेब,मुख्यलेखा अधिकारी श्री कोकाटे साहेब उमाळकर साहेब व सर्व विभाग प्रमुख तसेच कर्मचारी यांनी हिरवी झेंडा देऊन रॅली सुरू केली रॅली ची सुरुवात नगरपरिषद कार्यालयातून होऊन मुख्य रस्ता महावीर मार्ग कारंजा चौक स्टेट बँक चौक मार्ग ज्येष्ठ चौक नगर परिषद शाळा क्रमांक दोन बुलढाणा येथे सर्व शिक्षक कर्मचारी विद्यार्थ्यांना तिरंगा प्रतिज्ञा देऊन सांगता करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला या कार्यक्रमात यशस्वी यशस्वी साठी प्रशासक अधिकारी श्री संजय जाधव सर यांनी परिश्रम घेतल

# लताताई मनातली: घे जन्म तू फिरोनि...

## संपादकीय लेख

लता मंगेशकर यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त वाचकांना त्यांच्या आवडत्या गाण्यांच्या सुरेल आठवणी जाग्या केल्या. या सात स्वरांची जादू किती खोलवर मनामनात रुजलेली आहे, हे पुन्हा एकदा लक्षात आले. लताच्या गाण्यांच्या आठवणींचा स्वरमधुर, हवाहवासा प्रपातच जणू कोसळला. यातील काही निवडक भावस्पर्शी आठवणी... लता मंगेशकर म्हणजे कला जगतातील सात लखलखती अक्षरे.अक्षरे कसली? सात सुरांचे अद्‌भुत रसायन! या गानसरस्वतीचे एखादेच गाणे निवडायचे आणि त्यावर प्रतिक्रिया द्यायची म्हणजे केवढे कठीण काम! परंतु ते शिवधनुष्य उचलण्याचा वेडा प्रयत्न मी करणार आहे. लतादीदींच्या असीम प्रेमापोटी ही हिंमतकरणार आहे. मी मराठी गाणं निवडलं आहे. ङ्गप्रणयपंढरीचा वारकरीफ असे सन्मानाचे बिरुद रसिकांनी ज्या कवीला दिले, त्या माधव जूलियन यांची एक गाजलेली कविता. त्या कवितेचे नाव आहे - प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई... ङ्गआईफ या दोन अक्षरी शब्दात अद्‌भुत रसायन आहे. मातृसुखाला वंचित झालेल्या दुर्दैवी अशा जिवाचे हृदयस्पर्शी आक्रंदन या गीतात व्यक्त झाले आहे. या अभागी जिवाची या जगात आबाळ झालेली नाही, तरी त्याला मायेची पाखर भरभरून घालणाऱ्या वात्सल्यसिंधू आईची सतत उणीव जाणवत आहे. त्याचे हृदय विद्ध झाले आहे. आईचे रूप कुठेही पुसटतेसुद्धा चित्तात नसल्याने त्याचा जीव कासावीस झाला आहे सगळे उपाय थकले आहे. काय करू, कसे करू, या विचारांनी तो घायाळ झाला आहे. शेवटी हताश आणि अगतिक होऊन तो कळवळून म्हणतो, कारुण्यरसाने थबथबलेले हे नितांत सुंदर काव्य. थोर संगीतकार वसंत प्रभू यांचे बहारदार संगीत आणि लतादीदींच्या मधुर आणि आर्त स्वरांनी हे भावगीत अजरामर झाले आहे. लतादीदींच्या स्वरयंत्राची किमया अशी, की मींड, गमक, खनक, कर्ण, मुरक, गिराव, घसिट आणि ठहराव ही सर्व अंगे त्यांच्या स्वरयंत्रातून सहजतेने बाहेर पडतात. या गीतातील भावोत्कटता आपल्या मधाळ स्वरांनी इतक्या सहजतेने व्यक्त केली आहे, की गीत एकताना डोळे आपोआप पाझरायला लागतात. कधीही कंटाळा न येणारे, पुन:पुन्हा ऐकावेसे वाटणारे हे गीत माझे अत्यंत आवडते आहे.- संजीवनी आठवले, दापोडी

लतादीदी म्हणजे गायन क्षेत्रातला एक अद्भुत, ङ्गन भूतो न भविष्यतीफ असा एक चमत्कार. त्यांनी गायलेल्या हजारो गाण्यांपैकी एक गाणे माझ्या आवडीचे व अत्यंत ज वळचे आहे. ते म्हणजे - ङ्गप्रेमस्वरूप आई, वात्सल्य सिंधू आई.माधव ज्युलियनफ यांची कविता व ङ्गवसंत प्रभूफ यांचे संगीत लता मंगेशकरांनी आपल्या गोड आवाजाने हे गीत अमर केले आहे. एका आई नसलेल्या पोरक्या मुलाची व्यथा या गीतात मांडली आहे. दीदींच्या आवाजातील वात्सल्य, आर्तता, दु:ख, पो रकेपणाची भावना हे सगळे भाव स्पष्टपणे हृदयाला स्पर्श करतात. त्यांनी उत्कटपणे उच्चारलेला ङ्गआईफ हाशब्द ऐकून डोळे आपसूकच भरून येतात. कोणत्या उपायांनी बोलावले म्हणजे आई आपल्या जवळ येईल हे न कळल्यामुळे झालेल्या वेदना, दु:ख व हताशपणा हे भाव दीदींनी आपल्या तरल आवाजात व्यक्त केले आहे.आईविना पोरक्या झालेल्या बाळाच्या वेदना, तिचे रूपही आठवत नसताना जाणवणारी तिची उणीव यांची व्यथा दीदींनी आपल्या स्वरांनी पूर्णपणे मांडली आहे. आपल्या बाळाला कुशीत घेतलेली आई बघून या पोरक्या मुलालाहीआईच्या कुशीत जाऊन निजावेसे, हसावेसे वाटते. तिचे रूप आपल्या डोळ्यात साठवून घ्यावेसे वाटणारे उत्कट प्रेमळ भाव दीदींनीच व्यक्त करावे. शेवटच्या कडव्यात तर आईच्या छातीवर शांतपणे निद्रासुखाचा आनंद घ्यावा, इतकी उत्कटता त्यांच्या स्वरात उमटली आहे. आई नसणाऱ्या किंवा आईपासून बराच काळ लांब राहिलेल्या प्रत्येकाच्या काळजात आज इतकी वर्षे झाली तरी हे गाणे घर करून आहे. त्याला कारण म्हणजे दीदींचा करुणेनेओतप्रोत भरलेला आवाज.-श्रेयसी श्री. मोहनी

लता मंगेशकर आणि माझे वय जवळजवळ सारखेच आहे. अर्थातच लता माझ्या मनातली केव्हाच झालेली आहे. गेली अनेक वर्षे मी लताचा चाहता आहे. लताची सर्व गाणी मला गोड वाटतात त्यामुळे अधिक उत्कृष्ट कोणते,अशी निवड करता येणार नाही. परंतु या लताच्या सर्व गाण्यांतून मला आवडलेले गाणे म्हणजे ङ्गजा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा.फ कविवर्य पी. सावळाराम यांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या प्रसंगातून त्यांना हे गाणे स्फ ुरले आहे. माझ्याहीकुटुंबात झालेला प्रसंग मी पाहिला तेव्हा या गाण्याची आठवण झाली. असे प्रसंग आपल्यालाही लग्नसमारंभात पाहावयास मिळतात. या गाण्यातील प्रत्येक ओळीत एक प्रकारची वात्सल्याची माया आहे, हृदयाला पाझर फोडणारे शब्द आहेत. या गाण्यात साधे शब्द असून त्यात माया ओतप्रोत भरलेली आहे. नववधू सासरी जाताना तिच्या मनाची द्विधा परिस्थितीझालेली आहे. नाही म्हटले तरी, माहेरच्या ओढीमध्ये तफावत पडणार आहे, माय़ा बहुतांशी दुरावणार आहे. या विचाराने तिच्या मनात चलबिचल सुरू आहे. मनात अनेक प्रश्न भेडसावत आहेत. ती जड पावलाने निघालेली पाहूनआईला गहिवरून येते म्हणून आई म्हणते,ङ्गबघू नकोस मागे मागे लाडके! बघ पुढे, नको विसरू परि आईला.फ काळीज हलवणारे हे शब्द आहेत. भरल्या अंत:करणाने दिलेला हा मायेचा आशीर्वाद आहे आणि त्यामुळे भास होतोकी, जणू स्वत: लताच नववधूला मौल्यवान निरोप देत आहे. हे मनाला भिडणारे गाणे ऐकताना लताही श्रोत्यांचे मन जिंकीत असते आणि म्हणूनच लता मनात बिंबली आहे




# जिल्हा जातपडताळणी समिति अध्यक्षांचे रिक्त पद भरणार!

**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या रिक्त पदांची भरती लवकरच करण्यात येणार आहे. अमरावती विभागातील बुलढाणा, अमरावती आणि वाशिम या तीन जिल्ह्यांमध्ये अध्यक्षपदे सध्या रिक्त आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने प्रतिनियुक्तीच्या माध्यमातून ही पदे भरण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

ही पदे मंत्रालयीन सहसचिव संवर्गातील अधिकाऱ्यांकडून प्रतिनियुक्तीने भरण्यात येणार असून, इच्छुक अधिकाऱ्यांकडून सामान्य प्रशासन विभागाने अर्ज मागविले आहेत. या अर्जासोबत मागील पाच वर्षांचे गोपनीय अहवाल (प्रमाणित प्रती), वैयक्तिक माहिती, संपूर्ण सेवा तपशील, ना- विभागीय चौकशी प्रमाणपत्र तसेच मूळ विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२२ ऑगस्ट पर्यंत मंत्रालयीन सहसचिवांचे अर्ज मागविण्यात आले आहेत. या भरती प्रक्रियेमुळे जिल्हास्तरीय जात पडताळणी

समित्यांचे कामकाज अधिक गतिमान होईल, तसेच गरजू विद्यार्थ्यांना, नोकरीसाठी अर्ज करणाऱ्यांना आणि अन्य लाभार्थींना त्यांच्या प्रमाणपत्रांसंदर्भातील सेवासुविधा तत्परतेने मिळू शकतील. प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढल्या जातील.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# शहांना भेटून आलेल्या शिंदेंना फडणवीसांचा शह; भाईंच्या राजकीय डावपेचांवर कडी, भारी पडली सुतारवाडी



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गेल्याच आठवड्यात दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहांना भेटून आल्या. महायुतीत लक्ष घालण्याची विनंती त्यांनी दोन्ही नेत्यांकडे केली. गेल्या महिन्याभरात शिंदे यांनी तीनवेळा दिल्ली गाठली. पण आधीच्या दोन दौऱ्यांमध्ये त्यांना मोदी, शहा भेटले नव्हते. अखेर तिसऱ्या प्रयत्नात त्यांना मोदी, शहांची भेट मिळाली. पण यानंतरही महायुतीमधील परिस्थिती फारशी बदललेली नाही. याचा प्रत्यय सामान्य प्रशासन विभागानं काढलेल्या यादीतून आलास्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्ह्याजिल्ह्यात ध्वजारोहण करणाऱ्या मंत्र्यांची यादी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या खात्यानं जारी केली आहे. नाशिक आणि रायगड जिल्ह्यासाठी भाजपच्या गिरीश महाजन आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अदिती तटकरेंकडे ध्वजारोहणाची जबाबदारी देण्यात आलेली आहे. या दोन्ही नेत्यांची गेल्याच वर्षी पालकमंत्रिपदावर वर्णी लावण्यात आली. पण शिंदेसेनेनं आक्षेप घेतल्यानंतर त्यांना स्थगिती देण्यात आली. मात्र सहा ते सात महिने उलटून गेल्यावरही परिस्थिती बदलली आहे. आताही याच दोन नेत्यांकडे ध्वजारोहणाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे शिंदेसेनेला महायुती सरकारमध्ये दिल्या जाणाऱ्या वागणुकीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. गेल्या आठवड्यात एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत जाऊन शहांची भेट घेतली. त्यांच्यासोबत २५ मिनिटं चर्चा केली. मात्र या भेटीवर शहा यांनी सुतारवाडीला दिलेली भेट भारी पडल्याचं चित्र स्पष्ट दिसतं. अमित शहा एप्रिलमध्ये रायगडला आले होते. त्यांनी रायगडाला भेट दिली. किल्ल्यावरील शासकीय कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी शहांना तटकरेंनी त्यांच्या सुतारवाडीतील घरी जेवणासाठी आमंत्रण दिलं होतं. शहांनी आमंत्रण स्वीकारलं होतं. तटकरे यांच्या कन्या अदिती या फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात आहेत. त्या रायगड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकमेव आमदार आहेत. सेनेचे जिल्ह्यात तीन आमदार आहेत. पण तरीही तटकरे पालकमंत्री झाल्या. पण शिंदेसेनेच्या आक्षेपामुळे त्यांच्या पालकमंत्रिपदाच्या नियुक्तीला स्थगिती मिळाली. शहांची भेट घेऊन आल्यानंतरही शिंदे यांच्या हाती फारसं काही लागलेलं नाही. ध्वजारोहण करणाऱ्या मंत्र्यांची यादी प्रसिद्ध करताना फडणवीस यांनी तटकरे आणि महाजन यांच्या नावांचा समावेश करत शिंदेंना योग्य संदेश दिलेला आहे. दुसरीकडे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनीदेखील त्यांची ताकद दाखवून दिली. जिल्ह्यात सेनेचे तीन आमदार असताना, त्यातही भरत गोगावले मंत्री असतानाही त्यांच्या लेकीला ध्वजारोहणाचा मान मिळालेला आहे.शिंदे आणि शहा यांचे सुमधुर संबंध सर्वश्रुत आहेत. पण शहांच्या भेटीनंतरही शिंदेसेनेला मिळणाऱ्या वागणुकीत काही बदल झालेला नाही. दुसरीकडे तटकरेंनी त्यांचं वजन दाखवून दिलेलं आहे. त्यामुळे सुतारवाडी शिंदेंच्या राजकीय चालींवर भारी पडल्याचं चित्र आहे. अजित पवारांना भाजपच्या दिशेनं वळवण्यात, राष्ट्रवादीत बंड घडवून आणण्यात तटकरेंची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांनीच अजित पवारांचं मतपरिवर्तन केलं आणि त्यामुळेच अजित पवार भाजपसोबत गेले, अशी चर्चा आजही होते. विशेष म्हणजे तटकरे यांनी दिल्लीश्वरांसोबत उत्तम संबंध राखले आहेत. अजित पवार आणि शरद पवार सोबत आल्यास सर्वाधिक गोची तटकरे आणि पटेल यांची होऊ शकते. कारण अजित पवारांना शरद पवारांपासून दूर करण्यात आणि भाजपच्या जवळ नेण्यात पटेल, तटकरेंची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे काका, पुतणे एकत्र आल्यास या दोन्ही नेत्यांचं राजकारण अडचणीत येऊ शकतं. तशी परिस्थिती निर्माण झाल्यास भविष्यात अन्य मार्ग उपलब्ध असावेत याची काळजी तटकरे घेत आहेत. त्यांची शहांसोबतची जवळीक त्याचाच भाग आहे. शहा अद्याप शिंदे यांच्या घरी गेलेले नाहीत. पण तटकरेंनी मात्र शहांचा आग्रहानं पाहुणचार केलेला आहे.

# महाविकास आघाडीत बिघाडी होणार? निवडणुकीपूर्वी वडेट्टीवारांची पक्षाकडे मोठी मागणी



**पुणे:** देशासाठी इंडिया आघाडी झाली. महाराष्ट्रासाठी महाविकास आघाडी झाली. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी परिस्थिती पाहूनच निर्णय घेतला पाहिजे. या निवडणुका आम्हाला स्वबळावरच लढवू देत, अशी थेट मागणी काँग्रेसचे विधानसभेचे गटनेते विजय वडेट्टीवार यांनी मंगळवारी केली. काँग्रेसच्या नवनियुक्त प्रदेश पदाधिकाऱ्यांची दोन दिवसीय कार्यशाळा खडकवासला जवळील गोऱ्हे बुद्रुक येथे आयोजित करण्यात आली आहे. याच्या समारोप सत्रात वडेट्टीवार यांनी ही मागणी प्रदेश प्रभारी रमेश चेन्निथला यांच्याकडे केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मागील निवडणुकीत आम्ही मुंबईत स्वबळावर ३७ जागा जिंकल्या होत्या. वाईट काळ येतो आणि जातो आता मला स्वबळावर लढू द्या, अशी तुमची भावना आहे असे वडेट्टीवार कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले. उद्धव ठाकरे महाविकास आघाडीचा भाग आहेत. मात्र उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार अशी चर्चा आहे. आम्हालाही सातत्याने तेच विचारले जाते. पण या दोन भावांना आधी एकत्र तर येऊ द्या. मग पुढचं पुढे बघू, असेही वडेट्टीवार म्हणाले.दरम्यान, नेता नव्हे तर कार्यकर्ताच पक्षाला तारू शकतो. काँग्रेसचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे त्याचेच उदाहरण आहेत, असंही वडेट्टीवार यांनी यावेळी म्हटलं आहे.काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला काही प्रश्न विचारले आहेत.

त्याला उत्तर देणे हे आयोगाचे काम आहे. मात्र या आयोगाऐवजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच त्यावर प्रतिक्रिया देत आहेत. त्यांना हा अधिकार कोणी दिला, असा सवाल काँग्रेसचे प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी मंगळवारी केला. देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री आहेत की निवडणूक आयुक्त? अशी टीकाही त्यांनी केली. प्रदेश काँग्रेस नवनियुक्त कार्यकारिणीच्या कार्यशाळेसाठी आले असता, चेन्नीथला यांनी मंगळवारी पत्रकारांशी संवाद साधला.पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा हे सत्तेत असताना जिथे निवडणुका होतात, तिथे लोकशाहीचा खून करण्याचा प्रयत्न केला जातो. मोदी शहांच्या सत्ताकाळात मुक्त वातावरणात निवडणुका होऊच शकत नाहीत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगल्या जागा मिळाल्या. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीचा निकाल सर्वांसमोर आहे. राज्यातील सरकार हे जनतेने निवडून दिलेले नसून, निवडणूक आयोगाने निवडून दिले आहे. ह

च प्रकार हरियाणात घडला असून, बिहारमध्येही त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे. ज्यांनी पक्षाच्या पडत्या काळात पक्षाला साथ दिली पक्षासोबत उभे राहिले त्यांना पक्ष कायमच बळ देईल. परंतु याच काळात ज्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली त्यांना कदापिही पक्षात परत घेतले जाणार नाही, असं काँग्रेसचे प्रदेश प्रभारी रमेश चेन्निथला यांनी स्पष्ट केलं आहे.

# खरिपाची पिके धोक्यात, जुलै महिना कोरडा, शेतकऱ्यांच्या ९५ टक्के पेरण्या; पिकांची अखेरची घटका...



**पुणे :** राज्यात काही ठिकाणी पाऊस सक्रिय झाला असला, तरी जुलै महिना पूर्ण कोरडा गेल्याने त्याचा परिणाम खरिपातील पिकांवर झाला आहे. अनेक ठिकाणी पुरेसा पाऊस नसल्याने पिके अखेरची घटका मोजत आहेत. ढगाळ वातावरणामुळे उसाचे पीक वाढत नसल्याची स्थिती आहे. राज्यातील ३५८ तालुक्यांपैकी २२५ तालुक्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला असून, १३० तालुक्यांत १०० टक्क्यांहून अधिक पाऊस झाल्याची नोंद आहे.

यंदा १०६ टक्के पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. राज्यात मे महिन्याच्या अखेरीस नैऋत्य मोसमी वारे दाखल होऊन पावसाला सुरुवात झाली. दहा दिवस आधीच मान्सून दाखल झाल्याने मे महिन्याच्या अखेरीस आणि जूनमध्ये राज्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावली. पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भातील अनेक धरणे भरल्याने मोठ्या प्रमाणात विसर्गही झाला. मात्र, पेरणीनंतर पुरेसा पाऊस नसल्याने खरीपाच्या पिकांना फटका बसला आहे. विसर्ग केलेल्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्याने त्याचाही परिणाम खरीप पिकांवर झाला आहे. मे आणि जूनमधील पावसामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. मात्र, त्यानंतर मध्य महाराष्ट्राचा पूर्व भाग, खान्देश, मराठवाडा व विदर्भात पुरेसा पाऊस न झाल्याने त्याचा परिणाम पेरण्यांवर झाला आहे. पाऊस नसल्याने ही पिके जळण्याच्या स्थितीत आहेत. राज्यातील काही तालुक्यांत कमी पाऊस असल्याने पिके अडचणीत आली आहेत. शेतकऱ्यांनी सिंचन पद्धतीने पाणी दिल्यास पिके तग धरून राहतील, असं कृषी विभागातील वैभव तांबे यांनी सांगितले.६६ कमी पावसामुळे सोयाबीनचे आहे; तसेच मूग आणि उडिद पीकही कमी असेल. एकीकडे पाऊस कमी, तर छत्रपती संभाजीनगरमधील फुलंब्री, अकोल्यातील बाळापूर आणि परभणीतील सोनपेठ येथे अतिवृष्टी झाल्याने पिके वाहून गेली आहेत.राज्यात सरासरीच्या १४४ लाख ३६ हजार हेक्टरपैकी १३७लाख ३४ हजार हेक्टर म्हणजेच ९५ टक्के पेरण्या झाल्या आहेत. मागील वर्षी याच काळात १४५ लाख ८२ हजार हेक्टरवर पेरण्या झाल्या होत्या. राज्यात दोन महिन्यांत सरासरीच्या ५३८.५ मिलिमीटरपैकी ४९७.८ मिलिमीटर म्हणजेच ९२ टक्के पाऊस झाला आहे. १२ जिल्ह्यांत १०० टक्क्यांहून अधिक पाऊस पडला आहे. २२ जिल्ह्यांत १०० टक्क्यांपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. मध्य महाराष्ट्राचा पूर्व भाग, मराठवाडा, खान्देश, पश्चिम विदर्भात कमी पाऊस पडला आहे.

## त्यांना कठोर शिक्षा व्हावी, फेसबुकवर अखेरची इच्छा सांगत तरुणाने केली आयुष्याची अखेर, लातुरात खळबळ...

**लातूर :** लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील अंबुलगा बु. येथे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. भरत बालाजी सागावे (वय ३२) या तरुणानं फेसबुकवर आपल्या आयुष्याची अखेर करत असल्याचा व्हिडिओ काढत स्वतःच्या छातीत सुरा खुपसून जीवन संपवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आलीय. भरत अनेक वर्षांपासून मुंबईत वास्तव्यास होता. काल शनिवारी रोजी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास तो निलंगा शहरातील लांबोटकर पेट्रोल पंपाजवळ आंब्याच्या झाडाखाली बसून फेसबुकवर व्हिडिओ बनवत होता.मी सुरज बालाजी सागावे, मी जीव देत आहे. जीव देण्याचं कारण मी सुसाईड नोटमध्ये नोंद केलेलं आहे. मी मेल्याचा जबाबदार आणि माझ्या बायकोच्या मृत्यूला असलेले जबाबदार त्यांना कठोर शिक्षा व्हावी ही माझी शेवटची इच्छा आहे, असं व्हिडिओमध्ये सांगत त्याने काही वेळानंतर छातीत सुरा खुपसला आणि आपलं



आयुष्य संपवलं.नातेवाईकांनी फोन करून समजवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने फोन बंद करून ठेवला होता. शोध घेतल्यानंतर तो पेट्रोल पंपाजवळ रक्ताच्या थारोळ्यात जखमी अवस्थेत सापडला. त्याला तात्काळ लातूरमधील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आलं, परंतु उपचार सुरू असतानाच काही वेळात त्याचा मृत्यू झाला. आत्महत्येची कारणं अद्याप अस्पष्ट आहेत.दरम्यान, प्रेयसीने लग्नास नकार दिल्याने तरुणाने गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक समोर आली आहे. जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील गांधली गावातील गौरव बोरसे या तरुणानं आत्महत्या केली आहे. आत्महत्या पूर्वी इंस्टाग्रामवर () त्याने व्हिडिओ देखील पोस्ट केला आहे. मी एका तरुणीसोबत चार वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये होतो. आम्ही लग्न देखील केले होते. पण त्यावेळी आमचे वय कमी होते. आता मात्र त्या तरुणीने लग्नास नकार दिला आहे, तू मला विसरून जा, असं ती सांगत आहे.चार वर्ष रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर मला विसरून जा. असं कसं सांगू शकते तू? असा सवाल देखील या तरुणाने व्हिडिओ पोस्ट करत विचारला आहे. आई तू माझ्या मृत्यूनंतर जास्त रडू नको, मी तुझी इच्छा पूर्ण करू शकलो नाही. माझे वडील खूप गरीब माणूस आहे, त्यांना त्रास देऊ नकोस, त्यांना पण सांग, असं देखील त्याने या व्हिडिओमधून म्हटलं आहे. इंस्टाग्रामवर व्हिडिओ पोस्ट केल्यानंतर त्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. गौरवने इंस्टाग्रामवर पोस्ट केलेला व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

## तेजश्री प्रधान मालिकेच्या सेटवर कशी वागते?

**मुंबई:** अभिनेत्री तेजश्री प्रधान आणि अभिनेता सुबोध भावे यांची मुख्य भूमिका असणारी ही मालिका येत्या ११ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. सुबोध-तेजश्री यांच्या पात्रांची पस्तिशीनंतरची लव्ह स्टोरी तर या सिनेमात आहेच, पण भाऊ-बहीण या नात्यातील गोडवा, प्रेम आणि समजूतदारपणाही यामध्ये पाहायला मिळणार आहे. या मालिकेत तेजश्रीसोबत अभिनेता राज मोरे तिच्या धाकट्या भावाच्या भूमिकेत झळकणार आहे. राजने या मालिकेविषयी बोलताना तेजश्रीसोबतच्या त्याच्या ऑफस्क्रिन बॉन्डविषयी भाष्य केले.नुकत्याच झालेल्या शूटचा एक किस्सा राजने सांगितला. त्याने म्हटले की, तेजश्री ताईकडून मिळालेला सल्ला आणि सहकार्यामुळे टीममध्ये एक सकारात्मक ऊर्जा जाणवते. राज असे म्हणाला की, आमचे शूट सुरू होऊन जास्त दिवस नाही झालेत, पण माझा आणि तेजश्री ताईचा ऑफस्क्रिन बॉन्ड खूप छान झाला आहे. ती कडक शिस्तीची आहे, हे मला इतके दिवस काम केल्यानंतर समजलं आहे. ती मला सीन अजून कसा खुलून येईल याकरता सल्ला देते, तांत्रिकदृष्ट्याही चांगलं समजावते. जसं कधी एखादा शब्द घ्यायचा, हे तिला छान सुचते आणि त्याचा मलाही खूप फायदा होतो.त्याने पुढे असे म्हटले की, मला एका परफेक्ट सीनिअरप्रमाणे तेजश्री ताईचं मार्गदर्शन मिळतंय, ज्याचा एक कलाकार म्हणून खूप फायदा होतोय. फक्त तिचेच नाही, तर आम्हा सर्व कलाकारांचे काम छान होईल याकडे तिचे लक्ष असते आणि त्यासाठी तिचे प्रयत्न असतात. कारण, सगळं छान असेल तर शो भरभराटीला येईल. मालिकेच्या प्रोमोमध्ये दाखवले आहे की, ती माझ्यासाठी लग्न करत आहे. मालिकेत तुम्हाला ते बघायला मिळेल की मी तिच्याकडे काय हट्ट करतो आणि तिला का लग्न करावे लागते. गोष्ट खूप सुंदर लिहली आहे आणि मी आवर्जून सांगेन की मालिका तुम्ही नक्की बघा.या मालिकेत तेजश्री साकारत असणाऱ्या भूमिकेचं नाव स्वानंदी सरपोतदार असे असून, राजने रोहन सरपोतदार ही भूमिका साकारली आहे. त्याच्यासोबत पूर्णिमा डे महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहे.

# कारच्या डिक्कीमधून रक्त, पोलिसांनी विचारताच पळ काढला, पाठलाग करताना पोलिसांची गाडी पलटी; नांदेडमध्ये खळबळ...






**नांदेड :** गोमांसची तस्करी करण्याऱ्या एका चारचाकी वाहनाचा पाठलाग करत असताना पोलिसांची गाडी उलटून तीन पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. मुदखेड तालुक्यातील बारड येथील तोरणा तांडा परिसरात काल शनिवारी ही घटना घडली. दादाराव श्रीरामे, परमेश्वर श्रीमंगले आणि जिनेवाड असं जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. दरम्यान, घटनेच्या काही वेळातच पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने ते संशयित वाहन जप्त केलं. यावेळी पोलिसांना कारमध्ये ठेवलेल्या पाणाच्या जारमध्ये गोमास आढळून आले. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे.बारड महामार्गावर पोलीस टॅब आहे. या महामार्गावरून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची पोलिसांकडून तपासणी केली जाते. काल शनिवारी दुपारी तेलंगणा पासिंग असलेली कार नंबर टी.एस १६ ईपी २००२ हे वाहन बारड महामार्गावरून जात होती. पोलिसांना सदरील कार संशयित आढळून आल्याने चालकास वाहन बाजूला लावण्यास सांगितलं. कारच्या पाठीमागील डिक्कीमधून रक्त गळत असल्याचं निदर्शनास आलं. पोलिसांनी विचारणा करताच चालकाने गाडी घेऊन पळ काढला. यावेळी बारड मदत केंद्रावर कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी दादाराव श्रीरामे, परमेश्वर श्रीमंगले आणि जिनेवाड यांनी तात्काळ पोलिसांच्या गाडीतून त्या वाहनाचा पाठलाग केला. पाठलाग करत असताना तोरणा तांडा मार्गावर पोलिसांची गाडी उलटली. या अपघातात पोलीस कर्मचारी जखमी झाले. त्यांना गंभीर दुखापत झाली असून रुग्णालयात उपचार सुरु आहे.दरम्यान, तोरणा तांडा येथे असलेल्या नागरिकांच्या मदतीने पोलिसांनी ती संशयित कार ताब्यात घेतली. यावेळी तपासणी केली असता कारमध्ये असलेल्या पाच ते सहा पाण्याच्या जारमध्ये सव्वाशे क्विंटल गोमांस आढळून आलं. पोलिसांनी वाहनासह दोन आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. या प्रकरणी बारड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गो-हत्येवर बंदी असताना गोमांसची तस्करी सुरु आहे. कोणालाही संशय येऊ म्हणून तस्कराकडून वेगवेगळी शक्कल लढवली जात आहे. याचाच प्रत्यय कालच्या घटनेवरून पाहायला मिळत आहे. दरम्यान या घटनेनं एकच खळबळ उडाली आहे.

---

# सुरेश धसांचा कार्यकर्ता खोक्याला जामीन मंजूर, पण कोठडीतच रहावं लागणार, काय कारण?






**बीड :** बीड जिल्ह्याच्या शिरूर येथील भाजपचा पदाधिकारी आणिआष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस यांचा जवळचा कार्यकर्ता अशी ओळख असलेला सतीश भोसले उर्फ खोक्याचा जामीन अर्ज अखेर शिरूर न्यायालयाने मंजूर केला आहे. बीड जिल्ह्याच्या शिरूर कासार येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांनी हा जामीन अर्ज मंजूर केला आहे. आरोपी सतीश भोसले उर्फ खोक्या याच्याविरुद्ध वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. सध्या खोक्य उर्फ सतीश भोसले हा बीड कारागृहातील न्यायलयीन कोठडीतच आहे.शिरूर पोलिसांनी खोक्याच्या घरावर छापा मारल्यानंतर वन्यप्राण्यांच्या शिकारीचे साहित्य, प्राण्यांचे मांस, गांजा आढळून आलं होता. याप्रकरणी ॲडव्होकेट राजन धसे यांनी युक्तिवाद केला. त्यानुसार शिरूर कासार येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी त्याचा जामीन अर्ज मंजूर केला आहे. शिरूरमधील दिलीप ढाकणे आणि त्याचा मुलगा महेश ढाकणे यांना मारहाण केल्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर सतीश भोसले उर्फ खोक्याचे दहशत चर्चेचा विषय बनली होती. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या सतीश भोसले विरोधात गंभीर गुन्ह्यांच्या नोंदी आहेत.प्राणघातक हल्ला, फसवणूक, खूनाचा गुन्हा असे वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल असून वन विभागाच्या जागेवर दुमजली इमारत आणि त्या बाजूला आलिशान ऑफिस मधून सतीश भोसले त्याचा कारभार चालवत असल्याचं समोर आलं होतं .त्यानंतर वन विभागाने त्याच्या घरावर ऑफिसवर बुलडोझर चालवल्यानंतर त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी झाली होती . काही महिन्यांपूर्वी सतीश भोसले च्या घरावर वनविभागाने कारवाई केली होती. त्यानंतर त्याच्या घरात शिकारीचे साहित्य तसेच वन्यजीवांचे मास आढळून आले होते. खोक्याची पत्नी किरण भोसले आणि तिच्या परिसरातील महिलांनी देखील बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर त्यांचेवर अत्याचार केला आणि त्यांचे घरे पाडली या मागणीला घेऊन न्याय मागण्यासाठी अमरण उपोषण करण्यासाठी बसले होते. सतीश भोसले उर्फ खोक्या हा शिरूर कासार तालुक्यातील झापेवाडीचा रहिवासी आहे . मागील पाच वर्षांपासून तो राजकारणात सक्रिय होता. भाजप आमदार सुरेश धस यांचा जवळचा सहकारी व भाजपचा पदाधिकारी अशी त्याची ओळख आहे. या अगोदर सतीश भोसले वर अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. काही महिन्यांपूर्वी समाज माध्यमांवर दहशत पसरवणारे त्याचे व्हिडिओ व्हायरल झाले होते .वनविभागाची कारवाई व घरात सापडलेल्या ऐवजामुळे बीडमध्ये व राज्यभर खोक्याची एकच चर्चा झाली होती.

# बस बंद पडल्यास चालकाचा अर्ध्या दिवसाचा पगार कापणार; पीएमपीच्या अध्यक्षांचा आदेश; कर्मचारी संघटनांचा विरोध



**पुणे :** पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) स्वमालकीच्या बस रस्त्यात बंद पडल्यास संबंधित देखभाल दुरुस्ती अभियंता आणि चालक यांच्यावर आर्थिक कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, बस बंद पडल्यास दोघांच्या पगारातून अर्ध्या दिवसाचे वेतन कपात करण्यात येणार आहे. यासंदर्भात पीएमपीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांनी आदेश जारी केले आहेत.हा नियम फक्त पीएमपीच्या मालकीच्या बससाठी लागू असून, कंत्राटी पद्धतीवरील बसेसना त्यातून वगळण्यात आले आहे. त्यामुळे कामगार संघटनांनी नाराजी व्यक्त केली असून, या निर्णयावर वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.सध्या पीएमटीकडे एकूण १,९८३ बसचा ताफा आहे. त्यात ९६४ स्वमालकीच्या आणि १,०१९ कंत्राटी बसचा समावेश आहे. यापैकी स्वमालकीच्या ७३७ बस विविध आगारांमध्ये दुरुस्ती प्रक्रियेत आहेत. तांत्रिक बिघाड, अचानक ब्रेकडाऊन किंवा अन्य कारणांमुळे काही फेऱ्या रद्द होत असून, त्याचा परिणाम पीएपीच्या उत्पन्नावर होत आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी आणि प्रवाशांना चांगली सेवा मिळावी म्हणून ही कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.देवरे यांनी दिलेल्या सूचनांनुसार, बस मार्गावर पाठवण्यापूर्वी विभागीय देखभाल दुरुस्ती अभियंत्यांनी दुरुस्ती पूर्ण झाल्याची खात्री करावी. तसेच, चालकानेही तपासणी करूनच बस मार्गावर न्यावी. मात्र, संचलनादरम्यान बस बंद पडल्यास, अभियंता आणि चालक या दोघांच्या वेतनातून अर्ध्या दिवसाचे वेतन कपात केले जाईल. या निर्णयात कंत्राटी बस आणि त्यांच्या चालकांचा समावेश नसल्याने कर्मचारी संघटनांनी आक्षेप घेतला आहे. ‌ङ्कगाडीची दुरुस्ती करूनही ती बंद पडली, तर नियमानुसार प्रथम चौकशी होणे आवश्यक आहे. चौकशीनंतर कारवाई केली तर हरकत नाही. मात्र, या निर्णयातून ठेकेदारांच्या चालकांना सूट देण्यात आली आहे, त्यामुळे आम्ही या निर्णयाला विरोध करतो,ङ्क असे पीएमपी राष्ट्रवादी महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे सरचिटणीस सुनील नलावडे यांनी सांगितले.

# एकनाथ शिंदे राष्ट्रीय पातळीवर मोठा धमाका करण्याच्या तयारीत, दिवस ठरला; अजितदादांवर दबाव वाढला



उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते असलेल्या एकनाथ शिंदे यांनी गेल्याच आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहांची भेट घेतली. शिंदे गेल्या महिन्याभरात तीनदा दिल्लीला गेले आहेत. यातील आधीच्या दोन दौऱ्यांमध्ये त्यांनी मोदी, शहांची भेट मिळालेली नव्हती. पण गेल्या आठवड्यात त्यांना दोन्ही नेते भेटले. संसदेचं अधिवेशन सुरु असतानाही त्यांनी शिंदे यांना वेळही दिला. या बैठकांमध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. महायुती सरकारमध्ये असलेले शिंदेसेनेचे नेते, मंत्री सातत्यानं अडचणीत येत आहेत. त्यांना अडचणीत आणण्यामागे सरकारमधीलच काही जण असल्याची चर्चा होते. शिंदेंचे मंत्री तशी शंका खासगीत व्यक्त करतात. या संदर्भात शिंदे यांची मोदी, शहांशी चर्चा झाल्याची माहिती आहे. महायुतीत लक्ष घालण्याची विनंती शहांनी दोन्ही नेत्यांकडे केल्याचं समजतं. यासोबतच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातही चर्चा झाली. उद्धव ठाकरेंच्या पक्षाचे बहुतांश खासदार संपर्कात असल्याचा दावा शिंदे यांनी दिल्ली भेटीत भाजपच्या नेतृत्वाकडे केल्याची माहिती आहे. ठाकरेंचे लोकसभेत ९ खासदार आहेत. यातील १-२ खासदार वगळता अन्य खासदार संपर्कात असल्याचा शिंदेंचा दावा आहे. हे खासदार उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएच्या उमेदवाराला मतदान करु शकतात. तसं घडल्यास तो ठाकरेसेना आणि इंडिया आघाडीसाठी मोठा धक्का असेलउपराष्ट्रपती पदाची निवडणूक ९ सप्टेंबरला होणार आहे. लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार या निवडणुकीत मतदान करतील. निकाल त्याच दिवशी जाहीर होईल. दोन्ही सदनात एनडीए वरचढ असल्यानं सत्ताधाऱ्यांच्या उमेदवाराचा विजय निश्चित मानला जात आहे. पण शिंदेंनी ठाकरेंचे खासदार गळाला लावल्यास तो इंडिया आघाडीसाठी धक्का असेल. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतचोरीचा मुद्दा मांडत निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले. या प्रकरणी इंडिया आघाडीचं आंदोलन झालं. त्यात ३०० खासदारांचा सहभाग होता. ठाकरेंचे खासदार गळाला लावून शिंदे इंडिया आघाडीच्या एकजुटीला धक्का लावणार का, हे पाहणं महत्त्वाचं आहे.लोकसभेत एकूण ५४२ खासदार आहेत. पैकी २९३ सत्ताधारी एनडीएचे आहेत. तर राज्यसभेत हाच आकडा १२९ ते १३३ च्या घरात जातो. यात राष्ट्रपती नियुक्त खासदारदेखील येतात. यामुळे एनडीएचं एकूण संख्याबळ ४२२ पर्यंत जातं. निवडणूक जिंकण्यासाठी ३९४ मतांची गरज आहे. लोकसभेत इंडिया आघाडीकडे २३४ खासदारांचं बळ आहे. तर राज्यसभेत त्यांचे ७७ खासदार आहे. त्यामुळे उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंडिया आघाडीचा पराभव निश्चित मानला जात आहे. पण एकजुटीचा संदेश देण्यासाठी त्यांच्यासाठी ही निवडणूक महत्वाची आहे.

शिंदे यांनी ठाकरेंचे खासदार गळाला लावण्याची तयारी केल्यानं उपमुख्यमंत्री अजित पवार यांवरदेखील दबाव वाढला आहे. अजित पवार शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे किती खासदार गळाला लावणार हा प्रश्न आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक खासदार सत्तेसोबत जाण्याच्या भूमिकेत आहेत. त्यामुळे उपराष्ट्रपती पदाची निवडणूक उद्धव ठाकरे आणि शरद पवारांसाठी महत्वाची आहे. शरद पवारांकडे लोकसभेत ८ खासदार आहेत.उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत पक्षाचा व्हिप चालत नाही. या निवडणुकीत खासदारांनी सद्सद्विवेकबुद्धीला अनुसरुन मतदान करणं घटनाकारांना अपेक्षित आहे. त्यामुळे खासदार मतदान करताना पूर्णपणे स्वतंत्र आहेत. त्यात गोपनीय मतदान असल्यानं कोणतीही अडचण नसेल.

सरकारकडून मतदारसंघासाठी काय मिळेल, असा विचार करुनही खासदार वेगळा विचार करु शकतात. त्यामुळे उपराष्ट्रपती पदाची निवडणूक उत्कंठावर्धक असेल.

इंडिया आघाडीच्या खासदारांनी वेगळा विचार करुन मतदान केल्यास एनडीएच्या उमेदवाराचं मताधिक्क्य वाढेल. दुसऱ्या आघाडी, युतीच्या उमेदवाराला मतदान करताना काही सांकेतिक भाषा एकमेकांना सांगितल्या जात असतात आणि त्यावर राजकीय पक्ष एकमेकांवर विश्वास ठेवत असतात. त्यामुळे शिंदे कशा पद्धतीनं ठाकरेंचे खासदार गळाला लावतात, त्यात त्यांना यश येणार का, अजित पवार नेमकं काय करणार, याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.

# नोकरी जाण्याची भीती, ३ वर्ष अत्याचार, अश्लील फोटो अन्.. पंचायत समिती माजी सभापतीच्या पतीवर गंभीर आरोप

**बीड:** गेवराई (जि. बीड) पंचायत समितीच्या माजी सभापतीच्या पतीने अधिकाराचा गैरवापर करून पंचायत समितीतीलच एका महिला कर्मचाऱ्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. हा प्रकार सप्टेंबर २०२२ ते जुलै २०२५ या काळात घडल्याची माहिती आहे. याप्रकरणी वेदांतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहेदीपक प्रकाश सुरवसे (४४, रा. खांडवी, ता. गेवराई, जि. बीड) असे आरोपीचे नाव आहे. त्याचे वडील एका राजकीय पक्षाकडून गेवराई तालुकाध्यक्ष राहिलेले आहे. त्यांच्याकडे खांडवी गावाचे अनेक वर्षे सरपंचपद राहिले आहे, अशी माहिती सूत्रांनी दिलीअधिक माहितीनुसार, ३५ वर्षीय पीडिता २०१९ मध्ये गेवराई पंचायत समितीत नोकरीवर रुजू झाली. त्यावेळी सभापती म्हणून कल्पना सुरवसे होत्या, पण प्रत्यक्ष कारभार हा त्यांचा पती आरोपी दीपक सुरवसे सांभाळत होता. तोच सभापतींच्या खुर्चीवर बसायचा. अधिकारी, कर्मचाऱ्यांना सुचना द्यायचा. त्यातूनच त्याची पीडितेसोबत ओळख झाली. सप्टेंबर २०२२ मध्ये त्याने पीडितेला कामानिमित्त फाईल घेऊन संभाजीनगरला बोलावले. वेदांतनगर ठाण्याच्या हद्दीतील एका मोठ्या हॉटेलमध्ये येण्यास सांगितले.

कामकाजाचा भाग असल्याने पीडिता तेथे गेल्यावर आरोपीने हळूहळू सोबतच्या लोकांना बाहेर जायला सांगितले. पीडितेसोबत लगट करण्याचा प्रयत्न केला. पीडितेने विरोध करताच त्याने तिला नोकरी गमवावी लागेल, अशी धमकी दिली. त्यानंतर त्याने पीडितेवर बळजबरी अत्याचार केला. अश्लील फोटो काढल्याचे सांगून तिला ब्लॅकमेल केले. ऑक्टोबर २०२२ मध्ये इगतपुरी आणि त्यानंतर संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक



आदी ठिकाणी नेऊन अत्याचार केला, असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक प्रवीणा यादव यांनी दिली.आरोपी दीपक सुरवसे याने पीडितेला लग्नाचे आमिष दाखविले. तिला मे २०२५ मध्ये पतीपासून विभक्त करून फारकत घ्यायला लावली. त्यानंतर पीडिता संभाजीनगरातील गारखेडा परिसरात राहायला गेली. दीपकने तेथे येऊन तिच्यावर अत्याचार केले. २ जुलैला संध्याकाळी दीपक सुरवसे कारने (एमएच २३ एयू ५००१) तेथे आला. त्याने गोंधळ घालत व्हिडिओ व्हायरल करतो, तुझ्या मुलांना दाखवितो, असे म्हणून रस्त्यावरच पीडितेचा हात धरून ओढला. हा फक्त ट्रेलर आहे, असे म्हणत मारहाणीची धमकी दिली.

२ जुलैच्या रात्रीनंतर ३ जुलैला पीडिता आरोपी दीपकच्या खांडवी गावातील घरी गेली. त्याच्या वडिलांकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला. तसेच, त्याच्या मोबाइलमधील फोटो, व्हिडिओ डिलीट करण्याची विनंती केली. मात्र, दीपकच्या वडिलाने उलट पीडितेलाच अश्लील शिवीगाळ करून हाकलून दिले. आमचे हेच काम आहे, असे म्हणत तिला नोकरी घालविण्याची धमकी दिली. या प्रकरणाचा अधिक तपास वेदांतनगर ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक संगीता गिरी करीत आहेत.

# शेतरस्ते व गावाला जोडणारे रस्ते मोकळे करा

## राकाँचे प्रदेश उपाध्यक्ष तुकाराम अंभोरे पाटील यांची महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मागणी

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील शेतरस्ते, पांदनरस्ते, गाव सीमा रस्ते, गावाला जोडणारी रस्ते मोकळे करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तुकाराम अंभोरे पाटील यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्ह्यातील गाव खखेड्यातील जोडणारे रस्ते या ग्रामीण भागातील धामण्या समजल्या जातात. परंतु याच धमन्यांची अवस्था अतिशय बिकट झाल्याने गाव खेड्यात शेती करणे कठीण झाले आहे. गावातील समस्या, रुग्णालय, शाळकरी विद्यार्थी यांच्यासाठी गाव खेड्यातील रस्ते हे महत्वाचे ठरतात. परंतु गावातील शेत रस्ते, पांदण रस्ते गाव सीमेला जोडणारे रस्ते, गाव जोडणारे रस्ते हे मोकळे व्हायला पाहिजे आणि ग्रामीण भागातील समस्याचे निराकरण होण्यासाठी गाव खेड्यातील नागरिकांना सुख सुविधा पोहोचण्यासाठी रस्ते महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे हे रस्ते मोकळे करण्यात यावे. आपण सदरचे रस्ते मोकळे करण्याबाबत



व अडसर निर्माण करणाऱ्या व्यक्तीवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबतीत स्तुत्य निर्णय घेतला आहे. मात्र महसूल विभागाकडून अद्याप यासंदर्भात कोणत्याही प्रकारची कारवाई सुरू झालेली नाही. उलट शेत रस्त्या संदर्भात महसूल विभागाकडे हजारो प्रकरणे न्यायासाठी प्रलंबित आहेत. ज्या प्रकरणांचे निकाल लागले, त्या प्रकरणात निशुल्क पोलीस बंदोबस्त मिळत नाही. ही सध्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या प्रकरणी महसूल विभागाने स्वतः विशेष मोहीम राबवून व गृह विभागाने निशुल्क पोलीस बंदोबस्त देऊन आपण घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, जेणेकरून शेतकऱ्यांचे महसूल विभागाकडे असलेले वाद आपोआप मिटतील असा विश्वास व्यक्त करीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तुकाराम अंभोरे पाटील यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मागणी केली आहे. प्रत्यक्ष भेटीत तुकाराम अभोरे पाटील यांना शासन या संदर्भात तत्पर असून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना व पोलिस अधीक्षकांना स्वतःहून कारवाई करण्याचे देण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी देणार असल्याचे आश्वासित केले

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे गाळे माजी सैनिकांना भाडेतत्त्वावर उपलब्ध

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा तसेच वीरपत्नी यांना व्यवसायाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अधिनस्थ गाळे भाडेतत्त्वावर देण्यात येत आहेत. इच्छुकांनी आपले अर्ज १६ ऑगस्ट २०२५ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अधिनस्थ मेन रोडवरील सात गाळे भाडेतत्वावर उपलब्ध असून प्रत्येक गाळ्याचा आकार १० बाय २० फूट आहे. गाळ्याचे भाडे १२ हजार रुपये प्रतिमहिना (विद्युत बिल व्यतिरिक्त) असेल. इच्छुकांनी आपले अर्ज मुदतीत




जमा करावेत. मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. कार्यालयाचे गाळे भाडे तत्वावर देण्याकरीता प्राध्यान्यक्रम माजी सैनिक किंवा माजी सैनिक विधवा यांची नोंदणीकृत बँक किंवा पतसंस्था, माजी सैनिक/विधवा(वैयक्तिक व्यवसाय) व माजी सैनिक महिला बचत गट या प्रमाणे राहिल. गाळ्यांच्या वाटपासाठी एका वर्षाच्या भाड्याएवढी सुरक्षा अनामत रक्कम ( ) भरावी लागेल. भाडेकराराचा कालावधी दोन वर्षांचा राहील व करारनामा जिल्हा निबंधक कार्यालयात नोंदवावा लागेल. मंजूर अर्जदारांनी ठरवलेल्या अटी व शर्तीनुसार करार करणे बंधनकारक राहील, असे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने कळविले आहे.

# बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळ, बुलडाणा २०२५ ची कार्यकारिणी जाहीर...

जनसंचलन/बुलडाणा



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बुलडाणा अर्बन परीवाराकडून बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रात सर्वच ठिकाणी कमी अधिक प्रमाणात पाऊस झालेला असुन त्यामुळे नवचैतन्याची लहर मार्केटमध्ये दिसत आहे. मंडळाच्या वतीने यावर्षी दर्जेदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाचे वतीने दरवर्षी गणेश उत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. बुलडाणा अर्बन मंडळाचे यावर्षी २४ वे असून यावर्षी २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. गणेश उत्सावानिमित संस्थेने गणेश उत्सव मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक अनंताभाऊ देशपांडे कैलास बन्सीलाल कासट यांच्या मार्गदर्शनाखाली निवड करण्यात आली गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर अध्यक्ष संजयकुमार मुरलीधर राजगुरे तर उपाध्यक्षपदी प्रशांत श्रीराम काळवाघे, तर सचिवपदी श्रीकांत नागेश जोशी सहसचिव संजय मनोहर भागवत, कोषाध्यक्ष अनिल नारायण देशपांडे, सहकोषाध्यक्ष कैलास तुळशीराम निकम,तर सदस्य सर्वश्री रविंद्र प्रभाकर कुलकर्णी , सचिन सुधाकर शास्त्री, विजय समाधान डोंगरे, अजय पारसमल तातेड, नरेंद्र शिवलाल शर्मा, अनिल वासुदेव महाले , अजय विजय क -हाळे, विक्रांत सराफ संजय अंबादास पाठक,निलेश सुरेशराव बनसोडकर, अरुण नारायण देशपांडे, मंगेश प्रकाश बनसोड, प्रशांत देविदासपंत घुसळकर, अनिल वासुदेव महाले, प्रशांत देविदास घुसळकर, सुधाकर शिवाजी मानवतकर, प्रशांत सखाराम भराड, परमेश्वर भगवान शिंदे,महेश गायगोळ, लक्ष्मीकांत दिपक वारे, सौ.प्रिती अनिरुद्ध कोलारकर,सौ वर्षा कैलास खेडींकर, कु सुनिता नारायण जाधव,यांचा समावेश आहे. बुलडाणा अर्बन कर्मचारी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचा लाभ शहर व परिसरातील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष संजयकुमार मुरलीधर राजगुरे,,सचिव श्रीकांत नागेश जोशी व गणेशोत्सव मंडळ कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे. संस्थेच्या मुख्य कार्यालयात दि. १४ ऑगस्ट २५ गुरुवार रोजी श्रींचे मंडप पूजन, तर संस्थेच्या मुख्य कार्यालयात दि. २७ ऑगस्ट बुधवार रोजी मूर्ती स्थापना .गोवर्धन इमारतीमधील हॉल येथे दि.२८ ऑगस्ट २५ गुरुवार अथर्वशीर्ष पठण/उपासना . दि.२९ ऑगस्ट २५ शुक्रवार रोजी सायंकाळी ७ वाजता सहकार विद्या मंदिर, बुलडाणा चे सांस्कृतिक भवन. येथे चला हवा येऊ द्या चा हास्य व मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. ३० ऑगस्ट २५ शनिवार दुपारी ३ वा गोवर्धन इमारतीमधील पहिला मजला पार्किंग येथे पुरुष कर्मचारी एक मिनिट स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे, तर दि.३ सप्टेंबर २५ शनिवार रोजी दुपारी ३ वा. गोवर्धन इमारतीमधील पहिला मजला पार्किंग येथे महिला कर्मचारी एक मिनिट स्पर्धा होणार आहे, दि. ३ सप्टेंबर गुरुवार रोजी सकाळी ११ वा. गोवर्धन इमारतीमधील पार्किंग येथे वृक्ष वाटप करण्यात येणार आहे. दि. ४ सप्टेंबर गुरुवार रोजी कर्मचारी लाईव्ह ऑर्केस्ट्रा, गोवर्धन इमारतीमधील हॉल, दि.५ सप्टेंबर शुक्रवार रोजी सकाळी ११ वा. बुलडाणा अर्बन रेसिडेन्सी येथे खास महिलांसाठी पाककला स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. तर श्रींचे विसर्जन मिरवणूक दि. ६ सप्टेंबर शनिवार, दुपारी १२.३० वा. संस्थेच्या मुख्य कार्यालयातून निघणार आहे. गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचे बक्षीस वितरण व भंडारा दि. ८ सप्टेंबर सोमवारी सायंकाळी ७ वा. गोवर्धन इमारतीमधील हॉल व पार्किंग येथे होणार आहे, तरी मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचा आस्वाद बुलडाणा शहरातील गणेश भक्तांनी घ्यावा असे आवाहन गणेशोत्सव मंडळ कार्यकारिणी च्या वतीने करण्यात आले.

# उबाठाच्या बापात दम नाही...शब्द घेतले मागे....!

## बापाच्या आशीर्वादाने पहिल्यांदा निवडून आले-जयश्रीताई शेळके

## बेताल वक्तव्य व चुकीच्या वागणूकची कॉपी चांगली माणसं नक्कीच करणार नाहीत!

जनसंचलन/बुलढाणा

उबाठाच्या बापात दम नाही, असे वक्तव्य आमदार संजय गायकवाड यांनी केले. ङ्गउबाठ्याचा बापही माझी कॉपी करू शकत नाहीफ या वादग्रस्त वक्तव्यावरून राजकीय वर्तुळात खळबळ माजली असून, विरोधकांनी जोरदार टीका केली. अखेर गायकवाड यांनी स्पष्टीकरण देत यु-टर्न घेतला.मात्र उबठा शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी यावर झणझणीत प्रहार केला आहे. बेताल वक्तव्य व चुकीच्या वागणूकची कॉपी चांगली माणसं नक्कीच करणार नाहीत! असा टोला लगावत शेळके म्हणाल्या की,तीनदा पराभूत झालेल्या या आमदाराला शिवसेना हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे या बापानेच आशीर्वाद दिला व शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांना उमेदवारी दिल्याने हे महोदय पहिल्यांदा विधानसभेची पायरी चढू शकले.आता ते म्हणतात की, १० जन्म माझी कोणी कॉपी करू शकत नाही.कॉपी किंवा अनुकरण ही चांगल्या गोष्टींचे करायचे असते, बेताल वक्तव्य व चुकीची बेताल वागणूक याची कॉपी चांगले माणसे करत नाहीत,असा घणाघात शेळके यांनी आमदार गायकवाड यांचा समाचार घेताना केला. बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड हे नेहमीच त्यांच्या बेताल वक्तव्यांमुळे चर्चेत असतात. काल महायुती सरकारमधील वादग्रस्त आणि भ्रष्ट मंत्र्यांच्या हकालपट्टीच्या मागणीसाठी उद्धव ठाकरे गटाने राज्यभर ङ्गजनआक्रोश आंदोलनफ केले. या आंदोलना दरम्यान मुंबईसह अनेक ठिकाणी पथनाट्य, घोषणाबाजी आणि नाट्यमय आंदोलने करण्यात आली. त्यामध्ये काही दिवसांपूर्वी गायकवाड यांनी केलेल्या कृत्याचं पथनाट्यात रूपांतर करून सादरीकरण करण्यात आलं. यावर प्रतिक्रिया देताना संजय गायकवाड यांनी ङ्गमाझी कॉपी कोणीही करू शकत नाही. मी ओरिजनल आहे, इतकंच काय तर उबाठ्याचा बापही माझी कॉपी करू शकत नाहीफ असे वादग्रस्त वक्तव्य केले होते.हे वक्तव्य सोशल मीडियावर आणि राजकीय वर्तुळात जोरदार व्हायरल झाले. विरोधकांनी गायकवाड यांच्यावर टीकास्त्र सोडले. खासदार विनायक राऊत यांनी तर थेट टीका करत म्हटले की, गायकवाड यांची भाषा ही महाराष्ट्राच्या राजकारणातील घाणेरडी संस्कृती दाखवते. अशा लोकांच्या वक्तव्यामुळे जनतेत राजकारणाबद्दलची घृणा वाढते. महाराष्ट्रातील जनता त्यांना त्यांचा ङ्गबापफ दाखवून देईल.ङ्गङ्ग शिवसेना (उद्धव ठाकरे गट) नेत्या सुषमा अंधारे यांनीही प्रतिक्रिया देताना सांगितले, ङ्गङ्गत्यांची कॉपी करणं हे कोणत्याही सज्जन आणि कर्तबगार माणसाचं काम नाही. अशा शब्दांचा वापर करून लोकशाहीतील चर्चेची पातळी खालावली जाते. ङ्गङ्गवक्तव्यावरून निर्माण झालेल्या वादामुळे आणि वाढत्या दबावामुळे आज संजय गायकवाड यांनी स्पष्टीकरण देत यु-टर्न घेतला. त्यांनी सांगितले, ङ्गङ्गमी तसे बोललो नाही. तुम्ही माझ्या शब्दाचा विपर्यास केला आहे. मी उबाठा गटाच्या कार्यकर्त्यांविषयी बोललो होतो. बाळासाहेब ठाकरे हे सर्वांचे दैवत आहेत, ते सर्वांचेच बाप आहेत. माझ्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढण्यात आला आहे.ङ्गङ्गदरम्यान जय शितल शेळके म्हणाल्या की, वास्तव सिद्ध करण्यासाठी किंवा सत्य मांडण्यासाठी खूप हिम्मत लागते. ती हिंमत



नकली शिवसेनेच्या नकली लोकांमध्ये नक्कीच नाही.शिंदे गटाचे जे आमदार जी बेताल वक्तव्य करतात ते हा स्वतः चा इतिहास विसरले असतील,परंतु लोक विसरत नाहीत. तीन वेळा पराभूत झालेल्या या आमदाराला हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी आशीर्वाद दिला,शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उमेदवारी दिली तेव्हा पहिल्यांदा हे आमदार विधानसभेची पायरी चढू शकले.आता ते म्हणतात...माझे १० जन्म कुणी अनुकरण करू शकत नाही.खरंच आहे या जन्मात त्यांचे अनुकरण कुणीच करू शकत नाही कारण अनुकरण हे चांगल्या गोष्टींचे करायचे असते बेताल व गैरवर्तुणकीचे अनुकरण चांगली माणसे करीत नाहीत,असे शेळके म्हणाल्या.

## माळेगाव प्रकरणातील १२ आरोपींना जामीन मंजूर

## ॲड.शर्वरी तुपकरांचा जोरदार युक्तिवाद!



जनसंचलन/बुलढाणा

मोताळा तालुक्यातील माळेगाव येथे वन विभागाच्या अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईदरम्यान ग्रामस्थ आणि पोलिस-वन कर्मचारी यांच्यामध्ये संघर्ष झाला. या प्रकरणातील १२ आरोपींना मलकापूर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. २३ जुलै रोजी वन विभाग आणि पोलिस पथक माळेगाव शिवारात अतिक्रमण हटविण्यास गेले असता, ग्रामस्थांनी कारवाईला विरोध केला. ग्रामस्थांचा दावा होता की, ही जमीन गेल्या ३० वर्षापासून त्यांच्या ताब्यात असन तेथे घरे व शेती आहे. तर वन विभागाच्या नोंदीप्रमाणे जमीन त्यांच्या अखत्यारीत आहे. प्रकरणाचा निकाल जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित असतानाही कारवाई केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. झालेल्या वन कारवाईदरम्यान झटापटीत पोलिस आणि कर्मचाऱ्यांवर हल्ला झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. याप्रकरणी बोराखेडी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून विष्णू पु गायकवाड, संजय तु, पिंपळे, नामदेव भि. गायकवाड, मंगल दे. ठाकरे यांच्यासह १२ जणांना २४ जुलै ते ४ ऑगस्टदरम्यान अटक करण्यात आली होती. ॲड. शर्वरी सावजी-तुपकर यांच्या माध्यमातून सादर केलेल्या जामीन अर्जावर १२ ऑगस्ट रोजी अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. बी. जाधव यांनी सुनावणी घेतली आणि सर्व आरोपींना जामीन मंजूर केला

## कुत्रा आडवा आला अपघातात महिला ठार

जनसंचलन/ डोणगाव

अंजनी बु येथील दुर्गाबाई परमेश्वर पदमने (वय ४३) यांचा वाशीम जिल्ह्यातील पिंपरी सरहद्द येथे झालेल्या अपघातात मृत्यू झाला. कुत्रा अचानक दुचाकीसमोर आल्याने हा अपघात झाला. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे. १२ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारास दुर्गाबाई आपल्या पती परमेश्वर पदमने यांच्यासह वाशीम येथे मुलीला भेटण्यासाठी निघाल्या होत्या. मुंबई-नागपूर राज्य महामार्गावर पिंपरी सरहद्द गावाजवळ उतावली नदीच्या जवळ त्यांच्या मोटारसायकलसमोर अचानक कुत्रा आला. चालकाने ब्रेक मारताच मागे बसलेल्या दुर्गाबाई रस्त्यावर फेकल्या गेल्या. डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांना प्रथम मेहकर येथील रुग्णालयात, त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दुर्गाबाई पदमने यांना सहा मुली असून त्यातील दोन मुलींचे विवाह झाले आहेत, तर चार मुली विवाहयोग्य आहेत. त्यांच्या अपघाती निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून मुलीच्या भेटीसाठी गेलेली आईची ती भेट कायमची अधुरी राहिली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८